(१)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जा.क्र.मजीप्रा/१०९९/सभा-८५/आ-४

दिनांक : ४/१०/९९

**विषय** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८५ व्या सभेचे इतिवृत्त.

बुधवार दि.२९/९/१९९९ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८५ व्या सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे.

सोबत : ८५ व्या सभेचे इतिवृत्त

विजयकुमार अग्रवाल
५/१०/९९
**(विजयकुमार अग्रवाल)**
**सदस्य सचिव(प्रशासन)**

**मा.मंत्री,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अध्यक्ष**

अग्रवाल
५/१०/९९

टपाल (सह सचिव(प)) - seen by MS(A)
५/१०

## दिनांक 29 सप्टेंबर 1999 रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 85 व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची 85 वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष मा.श्री.अण्णासाहेब डांगे, यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 29 सप्टेंबर 1999 रोजी संपन्न झाली. या बैठकीस खालील सदस्य व विशेष निमंत्रित उपस्थित होते.

1. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष.
2. श्री.विद्याधर कानडे, सचिव, वित्त (व्यय) विभाग तथा सदस्य, म.जी.प्रा., मंत्रालय, मुंबई.
3. सौ.कल्पना पांडे, महापौर, नागपूर महानगरपालिका तथा सदस्य, म.जी.प्रा., नागपूर.
4. श्रीमती रेणूका मयेकर, अध्यक्ष, जिल्हापरिषद तथा सदस्य, म.जी.प्रा., सिंधुदूर्ग.
5. श्री.एन.व्ही.मिरानी, सदस्य, म.जी.प्रा., मुंबई (माजी प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग)
6. श्री.सुनिल वाघ, सदस्य, म.जी.प्रा., धुळे.
7. श्री.अशोकराव दादाबा चोरमले, सदस्य, म.जी.प्रा., मुक्काम करोडी पोस्ट चिंचपोट (इजदे) तालुका-- पाथर्डी, जिल्हा--अहमदनगर.
8. श्री.विजयकुमार अग्रवाल, सदस्य सचिव (प्रशासन), म.जी.प्रा., मुंबई.

या व्यतिरिक्त श्रीमती चेक्कला, उप सचिव, ग्राम विकास विभाग या सचिव, ग्राम विकास यांच्या वतीने, तर श्री.सं.र.शिरवळकर, अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग हे सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या वतीने उपस्थित होते. .

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी "विशेष निमंत्रित" म्हणून उपस्थित होते.

1. श्री.राजेंद्र सगणे, सदस्य सचिव (तांत्रिक), म.जी.प्रा., मुंबई.
2. श्री.शे.दौ.अरमाळ, विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नवी मुंबई.
3. श्री.अ.ना.अळवणी, मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, ठाणे.
4. श्री.स.रा.बागल, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
5. श्री.नि.कृ.माडा, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
6. श्री.मिलिंद केळकर, अधीक्षक अभियंता (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.
7. श्री.बी.टी.कांबळे, अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण कक्ष, म.जी.प्रा.,नवी मुंबई.
8. श्री.पी.के.सोनग्रा, अधीक्षक अभियंता, (मुख्यालय), म.जी.प्रा., नवी मुंबई.
9. श्री.गोपाळ शर्मा, अधीक्षक अभियंता, म.नि.सं. व स.कक्ष, म.जी.प्रा., नवी मुंबई.
10. श्री.शं.ग.तिवसकर, अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), म.जी.प्रा., ठाणे.
11. श्री.बी.एस.पाटील, उप मुख्य लेखाधिकारी (1), म.जी.प्रा., नवी मुंबई.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जा.क्र.मजीप्रा/१०९९/सभा-८५/आ-४ दिनांक : ४/१०/९९

**विषय** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८५ व्या सभेचे इतिवृत्त.

बुधवार दि.२९/९/१९९९ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८५ व्या सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे.

सोबत : ८५ व्या सभेचे इतिवृत्त

(विजयकुमार अग्रवाल) ५/१०/९९
सदस्य सचिव(प्रशासन)

**मा.मंत्री,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अध्यक्ष**

12. श्री.सोळंकी, वरिष्ठ लेखाधिकारी (निवृत्ती वेतन शाखा), म.जी.प्रा., नवी मुंबई.

श्री.वाडेकर, जनसंपर्क अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग हे देखील खास निमंत्रित म्हणून उपस्थित होते

---

सुरुवातीस सदस्य सचिव (प्रशासन) यांनी, अतिशय अल्प मुदतीची सूचना देऊन ही सभा घ्यावी लागल्याने सभेच्या प्रस्तावित कार्यक्रम बाबी सर्व सदस्यांना पुरेशा आधी पोचविता आल्या नाहीत याबाबत दिलगिरी व्यक्त केली.

तद्नंतर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाच्या अध्यक्षांच्या परवानगीने प्रस्तावित कार्यक्रम बाबींवर चर्चेस सुरवात झाली.

**<u>कार्यक्रम बाब क्र. 1 :— महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 84 व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.</u>**

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाच्या अध्यक्ष यांनी सदर इतिवृत्ताबाबत सदस्यांचे काही मुद्दे आहेत काय, किंवा, सदर इतिवृत्तात काही बदल करणे आवश्यक आहे काय, अशी विचारणा केली असता कोणीही त्याबाबत आक्षेप न घेतल्याने दिनांक 15 जून 1999 रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 84 व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यांत आली.

**<u>कार्यक्रम बाब क्र.2 :— महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 84 व्या सभेतील कार्यक्रम बाबीवर करण्यांत आलेली कृती.</u>**

(1) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 84 व्या सभेत रत्नागिरी येथील अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयासाठी इमारत व निवासस्थान बांधण्याबाबतची कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत आली होती. त्या अनुषंगाने मुख्य अभियंता, म.जी.प्रा., कोकण विभाग, ठाणे यांनी प्रस्तावित इमारतीचे त्रिमीती चित्र व छायाचित्र मा.अध्यक्षांना दाखविले व वास्तुविशारदांकडून तयार करण्यांत आलेल्या आराखडयानुसार अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.मंडळ, रत्नागिरी यांच्या कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यांत येईल असे सांगितले. मुख्य अभियंता, ठाणे यांनी असेही सांगितले की, रत्नागिरी येथे कार्यालयीन इमारत बांधण्यासाठी पुरेशी मोकळी जागा आहे. त्या अनुषंगाने इमारतीचे संकल्पन करण्यांत आले आहे. तथापी इतरत्र सर्वच ठिकाणी अशी मोकळी जागा उपलब्ध होऊ शकेलच असे नाही. त्यामुळे या इमारतीचा नकाशा नमुना म्हणून सर्वत्र वापरणे शक्य होईलच असे नाही. तथापी अशाच प्रकारच्या कार्यालयीन इमारतींचा प्रस्ताव यापुढे आल्यास आणि त्यावेळी दुस—या वास्तुविशारदाकडून वेगळे वैशिष्ठ्यपूर्ण संकल्पचित्र प्राप्त झाल्यास त्याचा स्वतंत्रपणे विचार करणे शक्य होईल असेही मुख्य अभियंता, म.जी.प्रा. कोकण विभाग, ठाणे यांनी सांगितले.

(2) विभागीय कार्यालयांना झेराक्स मशिन पूरविण्याबाबत सदस्य सचिव (प्रशासन) यांनी सांगितले की, सध्या कोणत्याही झेरॉक्स मशिनचा दरकरार उपलब्ध नसल्याने याबाबतचा निर्णय प्राधिकरणाला घेता आलेला नाही. तथापि दरकरार होण्यामध्ये अधिक काळ लागणे अपेक्षित असेल तर झेरॉक्स मशीनच्या उत्पादक कंपन्यांकडून प्राधिकरणास अपेक्षित असलेल्या प्रकारच्या झेरॉक्स मशिनसाठी दर बोलावून (कोटेशन) याबाबतचा निर्णय घेता येऊ शकेल.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाच्या 84 व्या सभेच्या कार्यक्रम बाबींवर करण्यांत आलेल्या कृतीच्या अहवालास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.3 : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करणेबाबत.**

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी सदर कार्यक्रम बाबीची माहिती सांगताना नमूद केले की, महा.जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने दिनांक 16.3.99 नंतर दिनांक 20.9.99 पर्यंत झालेल्या एकूण 12 वेगवेगळया सभांत घेतलेल्या निविदा स्वीकृती आणि अस्वीकृतीवरच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी ही कार्यक्रम बाब सादर करण्यांत आली आहे. समितीने एकूण 77 निविदा स्वीकृतीचे निर्णय घेतले असून 11 निविदा अस्वीकृत करण्याचा निर्णय घेतला आहे. स्वीकृत केलेल्या 77 निविदांबाबतची सविस्तर माहिती तक्ता–अ व तक्ता–अ–पूरक मध्ये देण्यांत आली आहे, तर अस्वीकृत केलेल्या 11 निविदांची माहिती तक्ता–ब मध्ये देण्यांत आली आहे, असेही त्यांनी सांगितले.

चर्चेनंतर प्राधिकरणाने खालीलप्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने, दिनांक 23.3.99, दि. 31.3.99, दि. 12.4.99, दि. 29.4.99 (आणि 4.5.99), दि. 12.5.99, दि. 1.6.99, दि. 8.6.99, दि. 17.6.99, दि. 7.7.99, दि. 15.7.99, दि. 27.7.99 व दि. 20.9.99 रोजी झालेल्या सभेत स्वीकृत केलेल्या कार्यक्रम बाब क्र.3 सोबत जोडलेल्या तक्ता "अ" मधील निविदा स्वीकृतीच्या निर्णयावर तसेच सोबत जोडलेल्या तक्ता "ब" मध्ये दर्शविलेल्या निविदा अस्वीकृतीच्या निर्णयावर या ठरावाद्वारे शिक्कामोर्तब करण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.4 :– कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.बांधकाम विभाग क्र.2, अमरावती यांच्या कार्यालयासाठी इमारत बांधणे.**

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी विषयांकित प्रकरणीची कार्यक्रम बाब प्राधिकरणाच्या 84 व्या सभेमध्ये सादर केली होती. परंतू सदर कार्यक्रम बाबीसोबत आवश्यक ते नकाशे व अंदाजपत्रके

जोडावयाची अनवधानाने राहिल्याने, तीच कार्यक्रम बाब पुन्हा सादर करण्यांत येत असल्याचे सांगितले. प्रस्तावित इमारत ही अस्तित्वातील मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयाच्या इमारतीला जोडून प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनीवर बांधावयाची असल्याचे सांगून सदर कामासाठी एकूण रु. 14.722 लाख खर्च अपेक्षित आहे असेही त्यांनी सांगितले.

प्रस्तुत प्रकरणी श्री.मेराणी, सदस्य, म.जी.प्रा. यांनी अशी विचारणा केली की, प्रस्तावित इमारत ही फक्त तळ मजल्यापूरतीच बांधणे प्रस्तावित आहे असे दिसते. भविष्यात लागणा–या वाढीव जागेचा विचार करुन तळ मजल्याची इमारत बांधताना त्यावर अधिक मजले बांधण्याची सोय करण्याची गरज आहे, या अनुषंगाने प्रस्तावित इमारतीत काय तरतूद केली आहे अशी विचारणा त्यांनी केली. याबाबत विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता यांनी वरील गोष्टीचा विचार करुन भविष्यात सध्या बांधावयाच्या, तळ मजल्यावर अधिक दोन मजले बांधता येतील (G+2) अशाच त–हेने इमारत प्रस्तावित करण्यांत येत असल्याचे सांगितले.

चर्चेनंतर प्राधिकरणाने खालीलप्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :**

कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.बांधकाम विभाग क्र.2, अमरावती यांच्या कार्यालयासाठी मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता, अमरावती यांच्या कार्यालयीन इमारतीस जोडून 190 चौ.मीटरचे विस्तरित बांधकाम करण्याच्या रु. 14.722 लक्ष (ढोबळ) किंमतीच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येत असून यावर होणारा खर्च प्राधिकरणाच्या कार्यालयीन इमारती या लेखाशीर्षामधून करण्यांत यावा. याबाबत करावयाच्या पुढील कार्यवाहीसाठी सदस्य सचिव (तांत्रिक) यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.5 : महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने गेल्या चार वर्षात केलेल्या कार्यासंबंधी जाहिरात स्वरुपातील माहिती वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याबाबत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळण्याबाबत.**

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी प्रस्तुत कार्यक्रम बाबीबाबत खुलासा केला की, दिनांक 3.3.99 रोजी टाईम्स ऑफ इंडीया, इकॉनॉमिक्स टाईम्स व इंडीयन एक्सप्रेस या दैनिकांच्या मुंबई, पुणे, नागपूर येथील आवृत्त्यांमध्ये गेल्या 4 वर्षात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने केलेल्या कार्यासंबंधी जाहिरात स्वरुपांतील माहिती प्रसिध्द करण्यांत आली होती, व सदर प्रसिध्दीपोटी मे. मार्केट मिशनरीज (इंडिया) प्रा.लि. यांचे रु. 6,61,539/– चे देयक शासनाने दिलेल्या आदेशानुसार महा.जीवन प्राधिकरणाने अदा केले असून त्यास खास कार्योत्तर मंजुरी प्राप्त करुन घेण्यासाठी ही कार्यक्रम बाब सादर करण्यांत आली आहे.

मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी या संदर्भात असे नमूद केले की इंग्रजी वर्तमानपत्रातून प्रसिध्द झालेल्या माहितीसाठी करावा लागणारा खर्च हा त्या आधी मराठी वृत्तपत्रातून प्रसिध्द झालेल्या खास पुरवणीसाठी वेगवेगळया ठेकेदारांकडून प्राप्त झालेल्या जाहिरातीच्या निधीमधून भागविणे अपेक्षित होते. असे असूनही इंग्रजी वर्तमानपत्रातील माहितीच्या प्रसिध्दीचे देयक अदा करावे लागले आहे, याचा अर्थ मराठी पुरवणीसाठी जाहिरातदारांकडून पूर्ण रकमा प्राप्त झालेल्या दिसत नाहीत.

याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे जनसंपर्क अधिकारी श्री.वाडेकर, यांनी असा खुलासा केला की, मराठी पुरवणीसाठी भूजल सर्वेक्षण विभागाच्या वेगवेगळया कंत्राटदारांकडून जितका निधी मिळणे अपेक्षित होते, तो प्राप्त न झाल्याने इंग्रजी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या माहितीचे देयक महा. जीवन प्राधिकरणाने अदा करावयाचा निर्णय शासनास घ्यावा लागलेला आहे.

वरीलप्रमाणे खुलासा करण्यांत आल्यानंतर चर्चेनंतर प्राधिकरणाने खालीलप्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :**

ठराव करण्यात येतो की, शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने गेल्या 4 वर्षात केलेल्या कार्यासंबंधीची जाहिरात स्वरुपातील माहिती टाईम्स् ऑफ इंडिया, दि इकॉनॉमिक्स् टाईम्स् व इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्रांत दिनांक 3 मार्च, 1999 रोजी प्रसिध्द केलेली असल्याने त्यापोटी प्राधिकरणाने शासनाच्या आदेशानुसार केलेल्या रु. 6,61,539/– खर्चास प्राधिकरण कार्योत्तर मंजुरी देत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.6 :– महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत नागरी तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजनांवर 1998–99 मध्ये झालेल्या खर्च.**

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी 1998–99 या आर्थिक वर्षात एकूण रु. 1138.38 कोटी खर्च करण्यांत आला असे सांगून त्यापूर्वीच्या 3 वर्षातील खर्चाशी तुलना करता उपलब्ध मनुष्यबळाचा जास्तीतजास्त वापर करुन 1998–99 मध्ये जास्तीतजास्त खर्च पाणी पुरवठा योजनांवर करण्याचा प्रयत्न प्राधिकरणाच्या क्षेत्रिय कार्यालयांनी केला असल्याचे सांगितले. 1998–99 या आर्थिक वर्षात जिल्हावार करण्यांत आलेल्या खर्चाची आकडेवारी देखील कार्यक्रम बाबीसोबतच्या तक्त्यांत सादर करण्यात आली आहे. सदर कार्यक्रम बाब मागील सभेत सूचित केल्याप्रमाणे माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

**कार्यक्रम बाब क्र.7 :– वेणा पाणी पुरवठा केंद्र, जिल्हा–नागपूर सेमिनरी हिल्स जलकुंभातून पाणी घेऊन कायमस्वरुपी नियमीत पाणी पुरवठा योजना राबविणे.**

केंद्र शासनाच्या नागपूर येथील अंबाझरी आयुध कारखान्याला पाणी पुरवठा करण्याकरिता रु. 7,27,73,000/– किंमतीची सदर योजना महा.जीवन प्राधिकरणाची योजना म्हणून प्रस्तावित करण्यांत

(2)

आली असल्याचे सदस्य सचिव (प्रशासन) यांनी सांगितले. याबाबत मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी अशी विचारणा केली की, सदर योजना जर अंबाझरी आयुध कारखान्यासाठी आहे तर त्या योजनांसाठी संपूर्ण रक्कम (पूर्ण ठेव तत्वावर) आयुध कारखान्याकडेच कां मागण्यांत येऊ नये, याबाबत असा खुलासा करण्यांत आला की, अस्तित्वातील योजना, ज्या योजनेद्वारे गेली सुमारे 30 वर्षे अंबाझरी येथील आयुध कारखाना व इतर 7 खेड्यांना आणि इतर काही ग्राहकांना पाणी पुरवठा केला जात आहे, ती योजना प्राधिकरणाचीच योजना आहे आणि ही योजना फायद्यात चालणारी योजना आहे.

तद्नंतर खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

<u>ठराव :</u>

नागपूर येथील वेणा पाणी पुरवठा केंद्राकरिता तयार करण्यांत आलेली रु. 6,27,73,000/- इतक्या ढोबळ किंमतीची कायमस्वरुपी नियमित पाणी पुरवठा योजना, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची योजना म्हणून मंजुर करण्यास या ठरावाद्वारे प्राधिकरण मान्यता देत आहे. तसेच याबाबत पुढील कार्यवाही करण्याबाबत प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**<u>कार्यक्रम बाब क्र.8 :- प्राधिकरणामार्फत राबविण्यांत येणा-या नागरी पाणी पुरवठा योजनांना कामाकरिता लागणारे सिमेंट कंत्राटदाराने आणणेबाबत.</u>**

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी प्रस्तुत कार्यक्रम बाबीबाबत थोडक्यात माहिती दिल्यानंतर मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी असे नमूद केले की, कामासाठी लागणारे सिमेंट प्राधिकरणाने विकत घेऊन दिले तर बाजारातील दरापेक्षा कमी दरात उपलब्ध होऊ शकेल, जेणेकरुन, असा कमी खर्च होऊन त्याचा फायदा शासनास मिळू शकेल.

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी या संदर्भात सांगितले की, सध्या नागरी पाणी पुरवठा योजनांबाबत सिमेंट, सी.आय. पाईप्स, डी.आय.पाईप्स वगळता इतर सर्व बांधकाम साधनसामुग्री ठेकेदारच आणतात व त्याची तपासणी कामावर प्रत्यक्ष वापर करण्यापूर्वी त्रयस्थ यंत्रणेमार्फत करुन घेण्यांत येते. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी संपूर्ण साधनसामुग्रीची व्यवस्था ठेकेदारामार्फतच केली जाते. या अनुषंगाने मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी असे सूचित केले की, नागरी पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत नवीन पध्दत चालू करावी किंवा कसे याबाबत सखोल विचार करण्याची गरज आहे. तोपर्यंत सध्याची पध्दत चालू ठेवावी.

या संदर्भात श्री.मेराणी, सदस्य, म.जी.प्रा. यांनी असे सूचित केले की, जास्त किंमतीच्या कामासाठी (सुमारे 25 ते 30 कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या) ठेकेदाराला सिमेंट आणावयास लावणे बंधनकारक करण्याचा विचार व्हावा. अर्थात असा निर्णय घेतला तर सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबत

काही मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत, त्यानुसार प्राधिकरणास देखील विचार करुन मार्गदर्शक सूचना क्षेत्रिय अधिका--यांना द्याव्या लागतील. वरीलप्रमाणे सूचित करण्यांत आल्यामुळे याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून माहिती गोळा करुन त्या अनुषंगाने आवश्यक असल्यास सदर कार्यक्रम बाब पुन्हा सादर करावी, परंतू तोपर्यंत सध्या अस्तित्वात असलेली पध्दत चालू ठेवावी असे ठरले.

---

**कार्यक्रम बाब क्र.9 :-  बृहत आराखड्याच्या अनुषंगाने पाणी पुरवठा योजनांचा प्रगती अहवाल :**

बृहत आराखडयाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा योजनांचा प्रगती अहवाल या कार्यक्रम बाबीद्वारे प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या माहितीकरिता सादर करण्यांत आला असल्याचे सदस्य सचिव (प्रशासन) यांनी सांगून त्याबाबतची थोडक्यात माहिती संचालक मंडळापुढे सादर केली. त्यांनी असेही सांगितले की, सुमारे 3906.94 कोटी रुपये खर्चाच्या एकूण 2268 योजना प्रगतीपथावर असून या योजनांतर्गत 6141 गांवे व 4475 वाडयांचा समावेश आहे. या सर्व योजनांसाठी मार्च 2000 पर्यंत एकूण रु. 2143.25 कोटी खर्च होणे अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त एकूण रु. 1284.97 कोटी खर्चाच्या, 1714 गांवे व 602 वाडयांसाठीच्या योजनांच्या निविदा प्राप्त झाल्या असून निविदा स्वीकृतीचा निर्णय प्रलंबित आहे.

श्रीमती रेणुका मयेकर, सदस्य, म.जी.प्रा. यांनी अशी विचारणा केली की, बृहत आराखडयात नवीन गावांचा समावेश आता करावयाचा असेल तर तो कसा करता येऊ शकेल. याबाबत मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी सांगितले की, प्रथमतः जेव्हा बृहत आराखडा बनविला त्यावेळेस त्यावेळच्या समस्याग्रस्त गावांचा समावेश करुन सुमारे रु. 15000 कोटी खर्चाचा बृहत आराखडा तयार करण्यांत आला होता. तथापी तद्नंतर काही गावांचा समावेश करावयाचा राहून गेला असल्याचे निदर्शनास आल्याने, तो सुधारित करण्यांत येऊन सुमारे 20000 कोटी रुपयांचा बृहत आराखडा तयार करण्यांत आला. बृहत आराखडयानुसार आतापर्यंत हाती घेण्यांत येऊन प्रगतीपथावर असलेल्या योजनांसाठी मार्च 2000 पर्यंत असलेल्या निधीची मागणी व वेगवेगळया स्त्रोतामधून (शासकीय अनुदान, आयुर्विमा महामंडळाचे कर्ज, केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान व कर्जरोख्याद्वारे उपलब्ध करावयाचा निधी) उपलब्ध होणा--या निधीचा विचार केला तर असे दिसते की, मार्च अखेर गरजेच्या मानाने निधीची उपलब्धता सुमारे 150 -- 200 कोटी रुपये कमी पडण्याची शक्यता आहे. या गोष्टीचाच विचार करुन निविदा समितीने असा निर्णय घेतलेला आहे की, ज्या योजनेच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत, त्यावरील स्वीकृतीचा निर्णय सद्यस्थितीत घेऊ नये. वरील गोष्टीचा विचार करुन यापुढे कोणत्याही नवीन गावाचा समावेश बृहत आराखडयामध्ये करणे शक्य होणार नाही. विशिष्ठ प्रकरणी बृहत आराखडयात आधीच समाविष्ठ असलेल्या योजनेत एखाद्या समस्याग्रस्त गावाचा समावेश करावयाचा राहिला आहे असे निदर्शनास आले तर अशा गावाचा समावेश बृहत आराखडयात नव्याने करण्याचा विचार अपवादात्मक परिस्थितीत करता येऊ शकेल. विधानसभेच्या निवडणूका झालेल्या असल्याने नवीन सरकारने पाणी पुरवठयाच्या कार्यक्रमावर धोरणात्मक निर्णय जाहीर करेपर्यंत याबाबत कुठलीही कार्यवाही करणे योग्य ठरणार नाही असेही मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी सांगितले.

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या कामाबाबत सदस्य सचिव (प्रशासन) यांनी अशी माहिती सांगितली की, केंद्र शासनाने ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसंदर्भात काही अमुलाग्र धोरणात्मक बदल करण्याचे ठरविले असून त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील धुळे, अमरावती, रायगड व नांदेड या 4 जिल्हयात "पायलट प्रॉजेक्ट" 1999–2000 या वर्षी हाती घ्यावयाचे ठरविले आहे व त्यासाठी निधीची खारा तरतूद देखील केंद्र शासनाकडून करण्यात येणार आहे. या 4 जिल्हयात हाती घ्यावयाच्या ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अनुभवानुसार क्रमाक्रमाने राज्यातील इतर सर्व जिल्हयात नवीन मार्गदर्शक तत्वानुसार पुढील कार्यक्रम या पंचवार्षिक योजने अखेर हाती घेण्यांत येणार आहे.

नवीन मार्गदर्शक तत्वानुसार योजनेच्या संकल्पनात लोकसहभाग, विशेष करुन महिलांचा सहभाग, मागणीनुसार योजनेचे संकल्पन करणे, योजनेच्या भांडवली खर्चात लाभार्थींचा लोकवर्गणीद्वारे 10 टक्के सहभाग, योजना पूर्ण झाल्यानंतर लाभार्थींची देखभाल दुरुस्तीची संपूर्ण आर्थिक व भौतिक जबाबदारी, परिसर स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य याबाबत लोकशिक्षण व सहभाग, इत्यादी बाबींचा समावेश आहे.

वरील सर्व बाबींची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**कार्यक्रम बाब क्र.10 :— महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आर्थिक स्थिती.**

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी महा.जीवन प्राधिकरणाच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीबाबत थोडक्यात माहिती सांगितली. त्यांनी असेही सांगितले की, आतापर्यंत हाती घेण्यांत आलेल्या योजनांच्या विचार केला तरीदेखील मा.मंत्र्यांनी यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे मार्च 2000 अखेर गरजेपेक्षा निधीची उपलब्धता सुमारे 150 – 200 कोटी रुपये कमी पडतील असे दिसते.

मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी, या कार्यक्रम बाबीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला येणे असलेल्या रकमेबाबतची जशी माहिती दिली आहे तशीच माहिती महा.जीवन प्राधिकरण इतर कोणत्याही यंत्रणांना देणे लागत असेल तर त्याची माहितीदेखील देणे आवश्यक होते असे सांगितले. अशाप्रकारची माहिती या पुढील सभांमध्ये देण्यांत यावी असेही त्यांनी सूचित केले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, आस्थापना व अवजारे खर्चापोटी (E.T.P.Charges) प्रत्यक्षात किती निधी जमा झाला व किती खर्च करण्यांत आला याची आकडेवारीदेखील देणे आवश्यक होते.

याबाबत हे स्पष्ट करण्यांत आले की, याबाबतची माहिती पृष्ठ क्र.35 वरील कार्यक्रम बाबीमध्ये देण्यांत आली आहे.

श्री.मेराणी यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, उपलब्ध आकडेवारीवरुन असे दिसते की, ई.टी.पी. चार्जेसपोटी 1998--99 या आर्थिक वर्षात महा.जीवन प्राधिकरणास रु. 155.22 कोटी प्राप्त झाले तर रु. 96.98 कोटी खर्च करण्यांत आला असे दिसते. त्यांनी पुढे असे सांगितले की, महा.जीवन प्राधिकरणाने काही योजना बनविण्याचे काम तांत्रिक सल्लागारांकडून करुन घेतले आहे व त्यापोटी केलेला खर्च हा एका दृष्टीने ई.टी.पी. खर्चाचाच भाग आहे. या दृष्टीने विचार केला तर कदाचित ई.टी.पी.पोटी जमा झालेली रक्कम व प्रत्यक्षात केलेला खर्च यांची तुलना आज दिसते तशी दिसणार नाही.

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी महा.जीवन प्राधिकरणास मार्च 99 अखेर राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हापरिषदांकडून एकूण 567.36 कोटी रुपये येणे असल्याचे सांगून ज्या 13 महानगरपालिका/नगरपालिकांकडून मोठया थकबाक्या आहेत, त्याची माहिती देखील कार्यक्रम बाबीत दिली असल्याचे सांगितले. ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून महा.जीवन प्राधिकरणास रकमा थकित आहेत, त्यापोटी त्यांना देय असलेल्या असांविधानिक अनुदानाच्या 50 टक्के रक्कम शासन स्तरावरुनच कपात करुन प्राधिकरणास उपलब्ध करुन दिली जाते, तथापी अशाप्रकारे प्राप्त होत असलेली रक्कम ही थकबाकीच्या प्रमाणात खूपच कमी असते, असेही सांगण्यांत आले.

प्रस्तुत प्रकरणी मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी असे सूचित केले की, नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर महा.जीवन प्राधिकरणास वेगवेगळया स्थानिक स्वराज्य संस्थांकडून येणे असलेल्या थकबाकीच्या वसुलीबाबत शासन स्तरावर निर्णय घेणे आवश्यक असल्याने मा.मुख्यमंत्र्यांकडे यथावकाश सभा आयोजित करण्यांत यावी.

वरील बाबींची प्राधिकरणाने नोंद घेतली.

**<u>कार्यक्रम बाब क्र.11 :-- सन 1999--2000 मध्ये नागरी तथा ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी कर्जरोख्याद्वारे निधी उभारणे.</u>**

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी 1999--2000 या सालामध्ये नागरी तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी कर्जरोख्याद्वारे निधी उभारण्यासंबंधी करण्यांत आलेल्या कार्यवाहीबाबत माहिती दिली. 1999--2000 या वर्षात एकूण 500 कोटी रुपये कर्जरोख्याद्वारे उभारण्यास शासनाने महा.जीवन प्राधिकरणास परवानगी दिलेली आहे. त्यापैकी 250 कोटी रुपये या आधीच उभारण्यांत आले असून उर्वरित 250 कोटी रुपये उभारण्याची कार्यवाही सुरु करण्यांत आली आहे. याबाबत मा.मंत्री, पा. पु. व स्व.तथा प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी असा मुद्दा मांडला की, या आधी सादर केलेली निधीची मागणी व निधीची उपलब्धता याची आकडेवारी पाहता मार्च 2000 पर्यंत सुमारे रु. 150 -- 200 कोटी कमी पडण्याची

शक्यता आहे असे दिसते. या बाबीचा विचार करता कर्जरोख्याद्वारे उभ्या करावयाच्या रु. 250 कोटीच्या दुस–या हप्त्याबाबतची कार्यवाही या आधीच करणे आवश्यक होते.

याबाबत सदस्य सचिव (प्रशासन) यांनी असे सांगितले की, शासनाकडून कर्जरोख्याद्वारे निधी उभारण्यासाठी मंजुरी व हमी प्राप्त झाल्यानंतर लगेच याबाबतची कार्यवाही करण्यांत आली आहे. त्यानुसार निधी उभारणीस सुरवात झाली असून येत्या महिना–दिड महिन्यांतच रु. 250 कोटी कर्जरोख्याद्वारे उभे करणे प्राधिकरणास सहज शक्य होईल. त्याचप्रमाणे त्यांनी पुढे असेही सांगितले की, 1999–2000 या वर्षात यापुढे देखील उच्चाधिकार समितीने रु. 500 कोटी पेक्षा जास्त निधी खुल्या बाजारातून कर्जरोख्याद्वारे उभे करण्याची परवानगी महा.जीवन प्राधिकरणास दिली तर असा निधी उभारण्यास मंजुरीदेखील याच कार्यक्रम बाबीद्वारे मागण्यांत आली आहे.

चर्चेनंतर खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

<u>ठराव :</u>

असा ठराव करण्यांत येतो की, सन 1999–2000 साली नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी वार्षिक योजनेंतर्गत तरतुदीनुसार व उच्चाधिकार समितीने दिलेल्या मान्यतेप्रमाणे रु. 250.00 कोटी इतका निधी भांडवली बाजारातून कर्जरोख्याद्वारे उभारलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

असाही ठराव करण्यांत येतो की, सन 1999–2000 साली मंजुर तरतुदींपैकी उर्वरित रु. 250.00 कोटी इतका निधी भांडवली बाजारातून उच्चाधिकार समिती ठरविल त्या अटी व शर्तीनुसार उभारण्यास मान्यता देण्यांत येत आहे. शासकीय/उच्चाधिकार समितीने याहीपेक्षा काही जास्त निधी, भांडवल बाजारातून उभारण्यास परवानगी दिल्यास, असा अतिरिक्त उभारण्यासही मंजुरी देण्यांत येत आहे.

असाही ठराव करण्यांत येतो की, कर्जरोखे उभारण्यासंबंधीची व उभारल्यानंतर कराव्या लागणा–या आवश्यक त्या बाबींची पूर्तता करण्याचे अधिकारी सदस्य सचिव (प्रशासन व बाहय अर्थसहाय्य) यांना प्रदान करण्यांत येत आहेत.

**<u>कार्यक्रम बाब क्र. 12 : 5 व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने निवृत्ती वेतन सुधारल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर पडणारा अधिक आर्थिक भार :–</u>**

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी स्पष्ट केले की, 5 व्या वेतन आयोगाच्या शिफारशी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचा–यांना शासकीय कर्मचा–याप्रमाणे लागू करण्यांत आलेल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निवृत्त कर्मचा–यांच्या 5 व्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने निवृत्ती

वेतनामध्ये वाढ करण्याबद्दलचा हा प्रस्ताव आहे. त्यासाठी पडणारा आर्थीक भार कशा प्रकारे वाढणार आहे, याबाबत सविस्तर माहिती कार्यक्रम बाबीत सादर केली असल्याचेही त्यांनी सांगितले.

" इतर महामंडळामध्येही अशाच प्रकारच्या प्रकरणी निर्णय प्रलंबित असल्याचे सांगून, ही धोरणात्मक कार्यक्रम बाब नवीन सरकारच्या स्थापनेनंतर यथावकाश प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या " सूचना मा.मंत्रीमहोदयांनी दिल्या.

**कार्यक्रम बाब क्र.13 : सन 1997--98 या वर्षाचा प्रशासकीय अहवाल :--**

सन 1997--98 या वर्षाचा प्रशासकीय अहवाला बाबत, कार्यक्रम बाबीतील महत्वाच्या मुद्दयावर सदस्य सचिव (प्रशासन) यांनी माहिती दिली. वार्षीक लेख्यास पूर्वीच मान्यता दिली गेल्याचेही त्यांनी सांगितले. लेखा परिक्षण अहवाल व प्रमाणपत्र त्वरित प्राप्त करुन घेणेबाबत वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना सूचित केले. सन 1997--98 चा अहवाल हा डिसेंबर 99 च्या हिवाळी अधिवेशनांत विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे मान्यतेसाठी ठेवण्यांत येणार असल्याने प्रशासकीय अहवालास मान्यता देण्याचा प्रस्ताव सभेपुढे ठेवण्यांत आला असल्याचे स्पष्ट करण्यांत आले. चर्चेअंती प्रशासकीय अहवालास मान्यता देऊन खालील ठराव मंजूर करण्यांत आला.

**ठराव :--**

असे ठरविण्यांत आले आहे की, प्राधिकरणाने 1997--98 या वर्षाच्या वार्षिक अहवालास मान्यता दिली असून तो विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्यासाठी, पाठविण्याचा प्राधिकार सदस्य सचिव यांना देण्यात आला आहे.

**कार्यक्रम बाब क्र.14:-- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचा--यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती संबंधात शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने महा.राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 च्या नियमात आकस्मिक उद्भवणा--या 23 गंभीर आजारावर तसेच 5 गंभीर आजारावर खाजगी रुग्णालयात विशिष्टोपचारावरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती संदर्भात विहित केलेल्या विहित वेतनगट व दरासंदर्भातील आदेश प्राधिकरणास लागू करण्याबाबत.**

कार्यक्रम बाबीतील महत्वाच्या मुदयांबाबत सदस्य सचिव (प्रशासन) यांनी सविस्तर माहिती दिली, व दिनांक <u>29/7/99</u> च्या शासन निर्णया प्रमाणे आकस्मिकता उदभवणा--या 23 गंभीर आजारावर तसेच 5 गंभीर आजारावर ,खाजगी रुग्णालयात घेतलेल्या विशिष्टोपचारावरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती संदर्भात प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कर्मचा--यांना/अधिका--यांना कशा लागू पडतात याबाबत स्पष्टीकरण त्यांनी केले. तसेच 45 अथवा त्यावरील वयोगटातील व असुधारित 3700--5000 या, किंवा जास्त वेतनमानात पगार घेणा--या अधिका--यांना, शासन निर्णय सा.आ.वि.क.

एमएजी/1098/प्र.क्र.220/आरोग्य 3 दिनांक 1/12/98 अन्वये वैद्यकीय तपासणी 3 वर्षातून एकदा करुन घेतल्यास व त्यावरील खर्चाच्या रु.3000/– च्या कमाल मर्यादेत प्रतिपूर्ती करण्यास देखील प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील रु. 3700–5000 (असुधारीत) वेतनश्रेणीतील संवर्गातील अधिका–यांना लागू करण्याचा प्रस्ताव मांडला.

सदर कार्यक्रम बाब पुढील प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये सादर करावी अशा सूचना मा.अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

**कार्यक्रम बाब क्र.15:– महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांत लघुटंकलेखकाचा तात्पुरता संवर्ग निर्माण करण्याबाबत :–**

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी विचाराधीन कार्यक्रम बाबी बाबत सविस्तर माहिती दिली, शासनाच्या 1997 मध्ये सुधारीत सेवा भरती नियमानुसार अर्हता प्राप्त लिपीक–टंकलेखक/टंकलेखक यांना प्रथम पदोन्नती लघुटंकलेखक म्हणून द्यावयाची आहे. तथापी प्राधिकरणांत लघु–टंकलेखक हा संवर्ग अस्तित्वात नसल्यामुळे, लघुटंकलेखक या पदावर लिपीक–टंकलेखक / टंकलेखकांना, पदोन्नती देता येत नाही. सुधारित सेवाभरती नियमानुसार लघुलेखकांची पदे लिपीक–टंकलेखक/टंकलेखक यांना पदोन्नती देवून भरता येत नाहीत. म्हणून प्राधिकरणांतील निम्नश्रेणी लघुलेखकांची रिक्त होणारी पदे यापुढे लिपीक–टंकलेखक/टंकलेखक पदावरील कार्यरत कर्मचा–यांना थेट निम्नश्रेणी लघुलेखक पदावर पदोनती देता येत नसल्यामुळे रिक्त होणारी नियमश्रेणी लघुलेखकांची पदे लघुटंकलेखक या खालच्या वेतनश्रेणीतील पदावर तात्पुरत्या रुपांतरीत करण्यांत येऊन प्राधिकरणांतील लिपिक–टंकलेखक/ टंकलेखकांना रुपांतरीत करण्यात आलेल्या निम्नश्रेणी लघुटंकलेखक पदावर शासनाच्या सेवाभरती नियमाप्रमाणे पदोन्नती देण्याचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या मंजुरीसाठी ठेवण्याचे प्रस्तावित आहे.यामुळे प्राधिकरणाला अधिक आर्थिकभार पडणार नसून उलट काहीं कालावधीसाठी आर्थिक भार कमी होणार आहे.

चर्चेनंतर खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

**ठराव :–**

शासन सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दिनांक 24 जून ,1997 अन्वये "स्वीय सहाय्यक गट–ब उच्चश्रेणी, लघुलेखक गट–ब व लघुटंकेखक गट–क" या पदांच्या सेवाभरतीचे नियम अंमलात आले आहेत. या नियमानुसार प्राधिकरणांतील निम्नश्रेणी लघुलेखकाचे रिक्त होणारे पद तीन वर्षासाठी लघु–टंकलेखक या पदावर तात्पुरत्या स्वरुपात रुपांतरीत करुन लघु–टंकलेखक या पदावर लिपिक–टंकलेखक/ टंकेखक पदावर कार्यरत असलेल्या व 80 शब्द प्रति मिनिट वेग मर्यादेचे लघुलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करणा–या कर्मचा–यांना पदोन्नती नेमणुक 50 : 50 या

प्रमाणात करण्यांस मान्यता देण्यात येत आहे. या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार सदस्य सचिव (प्रशासन) यांना देण्यांत येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.16 (आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.1) :-- मोरबे धरणाच्या बांधकामास निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट व नव्या मुंबईच्या काही भागास पाणी पुरवठा करण्यासाठी प्रथमतः पाताळगंगा नदी उद्‌भवावर आधारित पाणी पुरवठा योजना आखण्यांत आली. तथापी पाताळगंगा नदीमधून पाणी उचलण्याची परवानगी मर्यादित कालावधीसाठीच प्राप्त झाली असल्याने कायमस्वरुपी स्त्रोत म्हणून मोरबे धरणाची संकल्पना करण्यांत आली व 1990 पासून या कामास सुरवात झाली.

तद्‌नंतर काही कालावधीत पुरेसा निधी प्राप्त होत नाही, हे निदर्शनास आल्याने धरणाचे काम लवकर पूर्ण करता यावे म्हणून सिडकोने आर्थिक भार पेलण्यास सहमती दर्शविली व त्यामुळे कामास गती आली. गेल्या काही काळात या कामासाठी सिडकोकडून, त्यांची स्वतःची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नसल्याने, निधीचा पुरवठा करण्यांत आलेला नाही, व त्याचा विपरित परिणाम कामाच्या प्रगतीवर होत असल्याने त्यातून मार्ग काढण्यासाठी मार्गदर्शन मिळावे म्हणून ही कार्यक्रम बाब सादर करण्यांत आली आहे, असे सदस्य सचिव (प्रशासन) यांनी सांगितले.

मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी असे सूचित केले की, सुरुवातीस मोरबे धरणाच्या कामासाठी निधी प्राप्त करुन देण्यास सिडकोने मान्यता दिल्यामुळे हे काम प्राधिकरणाने हाती घेतले होते. आता सदर कामाची आर्थिक जबाबदारी सिडको टाळू पहात असेल तर प्रस्तुत प्रकरणी मार्ग काढण्यासाठी मा.मुख्यमंत्र्यांकडे सभा होणे अत्यावश्यक आहे.

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी याबाबत हे स्पष्ट केले की, या प्रकरणी मार्ग काढण्यासाठी वेगवेगळया स्तरावर या आधी ब--याच सभा झाल्या, तरीदेखील त्यातून मार्ग न निघू शकल्यामुळे नुकतीच मुख्य सचिवांकडे देखील एक सभा झाली आहे. तथापी अद्यापही सदर अडचणीतून मार्ग निघू शकलेला नाही. मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी या संदर्भात असे सूचित केले की, सिडको या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन देणार नसेल तर, मोरबे धरणावर या आधी केलेला खर्च वाया जाऊ नये म्हणून सदर धरण पूर्ण करण्याची आवश्यकता विचारात घेता, या धरणाचे पाणी उल्हास नदीमध्ये बोगद्याद्वारे आणून ते बदलापूर, अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण--डोंबिवली, ठाणे या भागासाठी पुरविणे शक्य आहे किंवा कसे याची चाचणी करण्यांत यावी. विशेषतः ठाणे परिसरांतील भविष्यातील पाण्याचा प्रश्न जागतिक बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र पाणी पुरवठा प्रकल्प टप्पा--2 अंतर्गत बांधावयाच्या पोशीर धरणाद्वारे सोडविणे प्रस्तावित आहे. तथापी पोशीर धरण भागातील संभाव्य धरणग्रस्त लोकांचा प्रश्न सुटलेला नसल्याने, पोशीर धरण प्रकल्प लवकर मार्गी लागू शकेल असे वाटत नाही. त्यामुळे मोरबे धरणातील

पाण्याचा उपयोग, आधी उल्लेख केल्याप्रमाणे बदलापूर, अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण--डोंबिवली, ठाणे या भागातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी, करणे शक्य आहे किंवा कसे, याबाबत विचार करणे गरजेचे आहे.

~~विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता यांनी प्रस्तुत प्रकरणी पाटबंधारे खात्याशी~~ सल्लामसलत करुन वरील बाबीची तपासणी करण्यांत येईल, असे सांगितले.

मा.मंत्रीमहोदयांनी असे सूचित केले की, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन कोयना जलाशयाच्या मध्यभागी पाण्याच्या खाली स्फोट घडवून पाटबंधारे खात्याने योजना कार्यान्वित केली आहे (Lake Tapping), त्याप्रमाणे किंवा दुस--या कोणत्याही अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करुन वर प्रस्तावित केलेली योजना कार्यान्वित करणे शक्य आहे किंवा कसे, याचा अहवाल तयार करावा.

विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता यांनी प्रस्तुत प्रकरणी, पाटबंधारे खात्याच्या मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडे याबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्यांत येईल असे सांगितले.

**<u>कार्यक्रम बाब क्र.17 (आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.2) : वेणा पाणी पुरवठा योजना -- घसारा निधीतून योजनेतील पंप व विद्युत उपकरणे बदलण्याबाबत.</u>**

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी वेणा पाणी पुरवठा योजनेतील सुमारे 30 वर्षापूर्वी कार्यरत करण्यांत आलेले पंप व विद्युत उपकरणे, घसारा निधीतून बदलण्याबाबत ही कार्यक्रम बाब सादर करण्यांत आल्याचे सांगितले. सदर पाणी पुरवठा केंद्रामधून अंबाझरी येथील आयुध कारखान्यास पाणी पुरवठा होत असल्याने व राष्ट्रीय संरक्षण दृष्टीकोनातून हा कारखाना अत्यंत महत्वाचा असल्याने सदर काम करण्याची गरज आहे असेही त्यांनी नमूद केले.

मा.मंत्रीमहोदयांनी अशी विचारणा केली की, सर्वसाधारणपणे पंपाचे आयुष्य किती असते,? त्यावर असा खुलासा करण्यांत आला की, सर्वसाधारण पंपाचे आयुष्य हे 15 वर्षाचे असते, परंतु प्रत्यक्षात 15 वर्षानी पंप बदलले जात नाहीत. अर्थात प्रत्यक्षात आयुष्य संपल्यानंतर पंप बंद पडत नसल्याने, सतत वापरामुळे झालेल्या झिजेमुळे पंपाची उदंचन क्षमता (Discharge) कमी होते व त्यामुळे पाणी पुरवठा केंद्राच्या एकूण क्षमतेत घट होते. वरीलप्रमाणे खुलासा करण्यांत आल्यानंतर वेणा पाणी पुरवठा केंद्रांतर्गत प्रक्रियापूर्व पाण्याचे कालबाहय झालेले पंप व विद्युत उपकरणे बदलून सदर खर्च (अंदाजित खर्च रु. 86.70 लाख) घसारा निधीतून करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत आली.

चर्चेनंतर खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

(90)

<u>ठराव :</u>

वेणा पाणी पुरवठा केंद्रांतर्गत प्रक्रिया पूर्व पाण्याचे 4 उत्सर्जक पंप व संबंधीत विद्युत उपकरणे बदलविण्याबाबत रु. 86,70,000/– ढोबळ खर्चाचे अंदाजपत्रकीय काम प्राधिकरणाच्या घसारा निधीतून करण्यास परवानगी प्रदान करण्यांत येत आहे. सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना घसारा निधीतून रक्कम काढण्याचे व काम पूर्ण करुन घेण्याचे अधिकार देण्यांत येत आहेत.

वरीलप्रमाणे प्रस्तावित सर्व कार्यक्रम बाबींवर चर्चा झाल्यानंतर सदस्य सचिव (प्रशासन) यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

तद्नंतर, मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी असे नमूद केले की, विशेषतः गेल्या दोन–अडीच वर्षात श्वेतपत्रिकेच्या अनुषंगाने व टँकरमुक्तीच्या अनुषंगाने महा. जीवन प्राधिकरणाने केलेली कामगिरी अतिशय प्रशंसनीय व उल्लेखनीय असून सर्वसामान्यांच्या नजरेस येईल अशीच झालेली आहे व त्याबाबत ते स्वतः मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता या नात्याने व प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने अतिशय समाधानी आहेत.

मा.मंत्रीमहोदयांनी देखील, प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या सदस्यांचे तसेच प्राधिकरणाच्या सर्व अधिका–यांचे शेवटी आभार मानले व सभा संपल्याचे घोषित केले.

sabha-85.m